# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

# नागरिकांची सनद

वांद्रे-कुर्ला संकुल,
वांद्रे (पूर्व),मुंबई – ४०० ०५१.
**दूरध्वनी.: २६५९०००१/४००० फॅक्स :२६५९१२६४**
**वेब साईट : :** https://mmrda.maharashtra.gov.in

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

**वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),**
**मुंबई – ४०० ०५१.**
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

---

# नागरिकांची सनद

## संघटना

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ अन्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची स्थापना दिनांक २६ जानेवारी, १९७५ रोजी झाली. मुंबई महानगर प्रदेशाचे (मुं.म.प्र.) क्षेत्र सुमारे ४३५५ चौ.कि.मी. असून त्यामध्ये बृहन्मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, उल्हासनगर, भिवंडी-निजामपूर, वसई-विरार आणि मिरा-भाईंदर या ८ महानगरपालिका आणि अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर, माथेरान, कर्जत, पनवेल, खोपोली, पेण, उरण व अलिबाग या ९ नगरपरिषदा तसेच ठाणे व रायगड जिल्हयांतर्गत सुमारे १००० च्या वर गावांचा समावेश होतो.

मुंबई महानगर प्रदेशाचा प्रादेशिक योजनेनुसार सुव्यवस्थित विकास व्हावे यासाठी नियोजन व समन्वयन संस्था म्हणून हे प्राधिकरण स्थापना करण्यात आले आहे.

प्रादेशिक महत्वाचे प्रकल्प तयार करणे व त्यास अर्थसहाय्य देणे, स्थानिक प्राधिकरणांच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांना मदत करणे, मुंबई महानगर प्रदेशातील विकासांच्या प्रयत्नांमध्ये समन्वय साधणे आणि प्रदेशावर विपरीत परिणाम होऊ शकेल अशा विकासास प्रतिबंध करणे यांचा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यामध्ये समावेश आहे.

याशिवाय महाराष्ट्र शासनाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची वांद्रे-कुर्ला संकुल, अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर आणि परिसर, ओशिवरे जिल्हा केंद्र, बॅकबे रिक्लेमेशन, वडाळा भारवाहक तळ, गोराई-मनोरी-उत्तन अधिसूचित क्षेत्र, छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ लि. अधिसूचित क्षेत्र, इंडीया युनायटेड मिल नं.६ (इंदू मिल) दादर, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतून वगळण्यात आलेल्या २७ गावांसाठी, भिवंडी परिसरातील ६० गावांसाठी या क्षेत्रांसाठी "विशेष नियोजन प्राधिकरण" म्हणून नियुक्ती केली आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मुंबई नागरी परिवहन प्रकल्प, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प आणि मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प, पादचारी उन्नत मार्ग, मोनोरेल प्रकल्प, निर्मल मुंबई महानगर प्रदेश अभियान, एमटीएचएल, एमएमसी (विरार ते अलिबाग) व भाडेतत्वावरील घरे या सारखे महत्वाचे प्रकल्प हाती घेतले आहेत.

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ मधील सुधारणा

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रादेशिक हद्दीमध्ये मुख्य पायाभूत सुविधांच्या विकासाचे प्रकल्प राबविण्यासाठी तसेच महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ नुसार प्रकल्प आणि परियोजना तयार करणे व त्यांची अंमलबजावणी करणे इत्यादी कार्ये पार पाडण्यासाठी महाराष्ट्र अधिनियम क्रमांक (४) १९७५, दिनांक ९ जानेवारी, २००३ अन्वये महाराष्ट्र शासनाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ मध्ये महत्वाच्या सुधारणा केलेल्या आहेत. या सुधारणांन्वये प्राधिकरणाला काही अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.

पायाभूत सुविधांमध्ये मार्ग, रस्ते, पूल आणि परिवहन व दळणवळणाच्या इतर साधनांचा आणि सदर पायाभूत सुविधा प्रकल्प किंवा प्रकल्प किंवा योजनांच्या अंमलबजावणीकरीता अनुषंगिक कार्यक्रम यांचा समावेश आहे.

या सुधारणांनुसार प्रकल्प आणि परियोजना तयार करणे व पार पाडणे यासाठी महानगर आयुक्त यांना "महानगरपालिका आयुक्त" व "झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण" असल्याचे मानण्यात येईल. या अधिनियमाद्वारे प्राधिकरणास मुंबई पोलिस आयुक्त यांचेही सहकार्य मिळणार आहे. प्राधिकरण हया अगोदर फक्त नियोजनाचे कार्य करीत असे. अधिनियमातील सुधारणांमुळे प्राधिकरणास पायाभूत सुविधांच्या कामांच्या अंमलबजावणीचीही कामे करावी लागणार आहेत.

प्राधिकरण प्रादेशिक योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात खालील कार्य करीत आहे :-

१) मुंबई महानगर प्रदेशाच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये सुधारणा करुन मेगा सिटी योजना कार्यान्वित केली आहे.

२) गोराई-मनोरी-उत्तन या अधिसूचित क्षेत्राकरीता प्राधिकरणाने प्रारुप विकास आराखडा तयार केलेला आहे.

३) आंतरराष्ट्रीय विमानतळ व महामुंबई (एस.ई.झेड) हे दोन प्रस्तावित प्रकल्प राबविण्यासाठी नियोजन करीत आहे.

४) मुंबई महानगर प्रदेशातील नागरी पायाभूत सुविधांसाठी वित्त सहाय्य करणे.

५) एकात्मिक ग्राम विकास योजनेला अर्थसहाय्य करणे.

६) जागतिक बँकेच्या मदतीने हाती घेतलेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्रकल्पाकरीता महानगर प्रदेश विकास प्राधिकरण समन्वयाचे काम करते.

७) मुंबई महानगर प्रदेशातील परिवहन व्यवस्थेत सुधारणा करण्याच्या शासन, भारतीय रेल्वे व प्राधिकरणामार्फत मुंबई नागरी परिवहन प्रकल्प राबवित आहे.

८) रेल्वे पुल या प्रकल्पामुळे बाधित होणा-या प्रकल्प ग्रस्तांचे पुनर्वसन करण्यात येते.

९) मुंबई मेट्रो रेल प्रकल्प राबवित आहे.

१०) मुंबई शहर हे प्रमुख आंतरराष्ट्रीय वित्तीय व व्यापार केंद्र म्हणुन ख्यातीप्राप्त आहे. याकरीता विविध पायाभूत सुविधा पुरवून त्यांचा विकास करण्यात येत आहे.

११) हे प्राधिकरण मुंबई पार बंदर पुल हा भारतातला सर्वात मोठा सागरी सेतू बांधण्याचा प्रकल्प राबवित आहे.

१२) भिवंडी परिसर अधिसूचित क्षेत्र व कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतून वगळलेल्या २७ गावांच्या अधिसूचित क्षेत्रांकरीता प्राधिकरणाने प्रारुप विकास आराखडा तयार केलेला आहे.

नागरिकांच्या सनदे अंतर्गत प्राधिकरणाच्या विभागांकडून नागरिकांना पुरविल्या जाणा-या सेवा :

# नियोजन विभाग

| अनु. क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचा हुद्दा | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या अधिकाऱ्याचे पदनाम |
|---|---|---|---|---|
| १. | प्रादेशिक योजनेसंबंधी अभिप्राय व ना-हरकत दाखले पुरविणे | वरिष्ठ नियोजक<br>नियोजक<br>उप नियोजक | २ महिन्यांपर्यंत (प्रकरणाच्या गुंतागुंतीनुसार) | प्रमुख, नियोजन विभाग |
| २. | प्रादेशिक योजनेचे नकाशे पुरविणे<br>अ) कृष्णधवल<br>ब) रंगीत | वरिष्ठ नियोजक | १ आठवडयांपर्यंत | प्रमुख, नियोजन विभाग |
| ३. | शासनाकडून व सहायक संचालक, नगर रचना, रायगड व ठाणे यांच्याकडून प्रादेशिक योजना संदर्भात प्राप्त झालेल्या प्रकरणांना अभिप्राय देणे | वरिष्ठ नियोजक<br>नियोजक<br>उप नियोजक | २ महिन्यांपर्यंत (प्रकरणाच्या गुंतागुंतीनुसार) | प्रमुख, नियोजन विभाग |
| ४. | अ) विकास नियंत्रण नियमावली पुस्तिका<br>ब) लोकसंख्या आणि रोजगार विषयक पुस्तिका पुरविणे | वरिष्ठ नियोजक | अ) त्याच दिवशी<br>ब) त्याच दिवशी | प्रमुख, नियोजन विभाग |
| ५. | मुं.म.प्रदेशातील विविध स्थानिक स्वराज्य संस्थांना प्राधिकरणात उपलब्ध असलेल्या विविध निधींच्या स्त्रोतातून वित्तीय सहाय्य देणे. | वरिष्ठ नियोजक<br>नियोजक<br>उप नियोजक | अ) मुं.म.प्र.वि.निधी (वित्तीय सहाय्याचा संपूर्ण प्रस्ताव सादर झाल्यानंतर ३ महिने)<br>ब) मुं.ना.वि.प्र. — फिरता निधी (वित्तीय सहाय्याचा संपूर्ण प्रस्ताव सादर झाल्यानंतर ३ महिने)<br>क) महानगर योजना — फिरता निधी (वित्तीय सहाय्याचा संपूर्ण प्रस्ताव सादर झाल्यानंतर ३ महिने) | प्रमुख, नियोजन विभाग |

## अभियांत्रिकी विभाग (मिठी नदी कामे)

| अनु. क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचा हुद्दा | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या अधिकाऱ्याचे पदनाम |
|---|---|---|---|---|
| १. | स्वच्छता व देखभाल | कार्यकारी अभियंता व उप अभियंता | ६ महिने | अधीक्षक अभियंता |
| २ | अ) संरक्षक भिंत व सेवा रस्त्याचे बांधकाम सा.क्र. ०.० मी ते १२८०.० मी. | कार्यकारी अभियंता | | अधीक्षक अभियंता |
| ३ | ब) संरक्षक भिंत व सेवा रस्त्याचे बांधकाम (लालबहादूर शास्त्री मार्गाच्या बाजूला सा.क्र. ३५०० ते ५४४०.० मी.) | कार्यकारी अभियंता | | अधीक्षक अभियंता |
| ४ | क) संरक्षक भिंत व सेवा रस्त्याचे बांधकाम (वाकोला नाला) सा.क्र. ७०५ ते २४५० मी.) | कार्यकारी अभियंता | | अधीक्षक अभियंता |
| ५ | ड) मिठी नदीचे शुध्दीकरण | कार्यकारी अभियंता | | अधीक्षक अभियंता |

## नगर व क्षेत्र नियोजन विभाग

| अनु. क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचा हुद्दा | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या अधिकाऱ्याचे पदनाम |
|---|---|---|---|---|
| १ | **बांधकाम परवानगी प्रकरणे**<br>१) जोत्यापर्यंत परवानगी | अति.महानगर आयुक्त (१) | ६० दिवस | महानगर आयुक्त |
| | २) जोत्यापुढे परवानगी | प्रमुख, न.व क्षे.नि.विभाग | ६० दिवस | अति.महानगर आयुक्त (१) |
| | ३) सुधारीत परवानगी | अति.महानगर आयुक्त (१) | ६० दिवस | महानगर आयुक्त |
| | ४) भोगवटा प्रमाणपत्र | अति.महानगर आयुक्त (१) | ६० दिवस | महानगर आयुक्त |
| | ५) भोगवटा प्राप्त इमारतीत फेरबदल / अंतर्गत सजावट | अति.महानगर आयुक्त (१) | ६० दिवस | महानगर आयुक्त |
| | ६) तात्पुरते बांधकाम परवानगी | वरिष्ठ नियोजक | ३० दिवस | प्रमुख, न.व क्षे.नि.विभाग |
| | ७) खोदकाम परवानगी | प्रमुख, न.व क्षे.नि.विभाग | ३० दिवस | अति.महानगर आयुक्त (१) |
| २ | विकास आरखडा अभिप्राय | नियोजक / वास्तुशास्त्रज्ञ | ३० दिवस | वरिष्ठ नियोजक |
| ३ | संकीर्ण ना हरकत दाखला | प्रमुख, न.व क्षे.नि.विभाग | ३० दिवस | महानगर आयुक्त |
| ४ | संकीर्ण पत्रव्यवहार | प्रमुख, न.व क्षे.नि.विभाग | ३० दिवस | महानगर आयुक्त |
| ५ | बांधकाम परवानगीची वैधता | प्रमुख, न.व क्षे.नि.विभाग | ३० दिवस | महानगर आयुक्त |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | वाढविणे | | | |

## परिवहन व दळणवळण विभाग (मुंबई मेट्रो लाईन - १ व २, मोनोरेल व नगर रचना शाखा)

| अनु. क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचा हुद्दा | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या अधिकाऱ्याचे पदनाम |
|---|---|---|---|---|
| १. | नागरीकांच्या सूचना व हरकतींवर कार्यवाही | अधीक्षक अभियंता | ६० दिवस | प्रमुख, प. व द. विभाग |
| २. | मेट्रो लाईन - १ प्रकल्पाशी संबंधीत सूचना व हरकतींवर कार्यवाही | कार्यकारी अभियंता | ४५ दिवस | अति.प्रमुख (ए.मुं.म.प.प्रा.), प. व द.विभाग |
| ३. | मेट्रो लाईन – २ प्रकल्पाशी संबंधीत सूचना व हरकतींवर कार्यवाही | अधीक्षक अभियंता | ४५ दिवस | अति.प्रमुख (प.नि.) प. व द.विभाग |
| ४. | मोनोरेल प्रकल्पाशी संबंधीत सूचना व हरकतींवर कार्यवाही | कार्यकारी अभियंता | ४५ दिवस | अधीक्षक अभियंता |
| ५. | मेट्रो व मोनोरेलकरीता ना हरकत दाखले पुरविणे | नगर नियोजक | ४५ दिवस | प्रमुख, प. व द. विभाग |

## जनसंपर्क

| अनु. क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचा हुद्दा | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या अधिकाऱ्याचे पदनाम |
|---|---|---|---|---|
| १. | प्राधिकरणाच्या अखत्यारीतील प्रकल्पांच्या जाहिराती अद्ययावत करुन ती प्रायोजकत्व व स्विकारलेल्या विविध मासिके, साप्ताहिके मध्ये देणे | सहा.जनसंपर्क अधिकारी | २ दिवस | सह प्रकल्प संचालक (जनसंपर्क) |

## सामाजिक विकास कक्ष

| अनु. क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचा हुद्दा | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या अधिकाऱ्याचे पदनाम |
|---|---|---|---|---|
| १. | अ-१) मुंबई मोनोरेल प्रकल्प, आणिक पांजरपोळ जोडरस्ता प्रकल्प, पीजीएलआर, सायन – कोळीवाडा, पूर्व मुक्त मार्ग, मुंबई पारबंदर प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन करणे तसेच प्रकल्पग्रस्तांच्या तक्रारींची पुर्तता करणे / माहिती देणे,<br><br>तसेच वरील प्रकल्पासाठी जमिनींचे भूसंपादन / हस्तांतरण | तहसिलदार / समाज विकास सहाय्यक | संबंधीत उपजिल्हाधिकारी (अतिक्रमण / निष्कासन) यांच्याकडून परिशिष्ट-२ प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांपर्यंत<br><br>विहीत कालावधी निश्चित नाही तथापि २ वर्षे | उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन व पुनर्वसाहत) समाज विकास अधिकारी / उप समाज विकास अधिकारी |
| | अ-२) T.D.R. (विकास हक्क हस्तांतरण) | तहसिलदार | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडून संपादित केलेल्या खाजगी मालकीच्या जमिनींचा निवाडा घोषित झाल्यापासुन २ महिन्यात विकास हक्क हस्तांतरण प्रस्ताव पालिकेकडे पाठविणे. | उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन व पुनर्वसाहत) तथा विशेष भूसंपादन अधिकारी |
| | ब) MUTP व MUIP अंतर्गत येणाऱ्या सर्व प्रकल्पांतील बाधितांचे पुनर्वसन करणे कामी आवश्यक खाजगी / शासकीय जमिनींचे भूसंपादन करणे | उप जिल्हाधिकारी / समाज विकास अधिकारी / उप समाज विकास अधिकारी / तहसिलदार | विहीत कालावधी निश्चित नाही तथापि २ वर्षे | प्रमुख, सामाजिक विकास कक्ष |

| अनु. क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचा हुद्दा | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या अधिकाऱ्याचे पदनाम |
|---|---|---|---|---|
| २. | पात्र प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करणे | उप जिल्हाधिकारी / समाज विकास अधिकारी / उप समाज विकास अधिकारी / तहसिलदार / समाज विकास सहायक | निवासी -- ३० दिवसांपर्यंत अनिवासी — ४५ दिवसांपर्यंत | प्रमुख, सामाजिक विकास कक्ष |
| ३. | एन.जी.ओ.मार्फत प्रकल्पग्रस्तांचे सामाजिक व आर्थिक सर्व्हेक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्या आधारे पात्रता यादी तयार करणे व सक्षम अधिकाऱ्यांची मंजुरी घेणे | उप जिल्हाधिकारी / समाज विकास अधिकारी / उप समाज विकास अधिकारी / तहसिलदार | ३० दिवस | प्रमुख, सामाजिक विकास कक्ष |
| ४. | प्रकल्पग्रस्तांची वितरणपत्रे तयार करणे | उप समाज विकास अधिकारी / समाज विकास सहायक | २० दिवस (प्रकल्पग्रस्तांच्या संख्येनुसार) | उप जिल्हाधिकारी / समाज विकास अधिकारी |
| ५. | पात्र प्रकल्पग्रस्तांच्या वितरणपत्राची तपासणी करणे | उप जिल्हाधिकारी / समाज विकास अधिकारी / तहसिलदार | १० दिवस (प्रकल्पग्रस्तांच्या संख्येनुसार) | प्रमुख, सामाजिक विकास कक्ष |
| ६. | प्राधिकरणाकडे संपर्क साधणाऱ्या प्रकल्पग्रस्तांना माहिती पुरविणे | उप जिल्हाधिकारी / समाज विकास अधिकारी / उप समाज विकास अधिकारी / तहसिलदार | १० दिवस | प्रमुख, सामाजिक विकास कक्ष |
| ७. | प्रकल्पग्रस्तांच्या तक्रारीची दखल घेणे | उप जिल्हाधिकारी / समाज विकास अधिकारी / उप समाज विकास अधिकारी / तहसिलदार / समाज विकास सहायक | १५ दिवस | प्रमुख, सामाजिक विकास कक्ष |

| अनु. क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचा हुद्दा | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या अधिकाऱ्याचे पदनाम |
|---|---|---|---|---|
| ८. | मुंबई नागरी परिवहन प्रकल्पामुळे विविध रस्त्यांच्या रुंदीकरणामुळे बाधित होणाऱ्या म्हाडाच्या व मुंबई महानगरपालिकेच्या लेआऊटमधील इमारती व चाळीतील प्रकल्पग्रस्त सदनिकाधारकांच्या पुनर्वसन व पुर्नबांधणीचे नियोजन विकाससंबंधीत प्रस्ताव बनविणे व त्यास अंतर्गत मंजुरी प्राप्त करणे | उप नियोजक | ६० दिवस | प्रमुख, सामाजिक विकास कक्ष |
| ९. | प्राधिकरणामार्फत पुनर्वसन केलेल्या विविध पुनर्वसन वसाहतीमधील प्रकल्पग्रस्तांसाठी मान्यताप्राप्त झालेल्या प्रशिक्षणाच्या कार्यक्रमाचे नियोजन | समाज विकास सहायक | ५ दिवस (प्रकल्पग्रस्तांच्या संख्येनुसार) | उप समाज विकास अधिकारी |
| १०. | प्रकल्पबाधितांना सोसायटी स्थापनेबाबत माहिती देणे | समाज विकास सहायक | ५ दिवस (प्रकल्पग्रस्तांच्या संख्येनुसार) | उप समाज विकास अधिकारी |
| ११. | प्रकल्पबाधितांना सोसायटी स्थापनेसाठी व नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सहाय्य करणे | समाज विकास सहायक | ५ दिवस (प्रकल्पग्रस्तांच्या संख्येनुसार) | उप समाज विकास अधिकारी |
| १२. | सोसायटी नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर उपलब्ध देखभाल निधीच्या रकमेची गुंतवणूक करणे | उप समाज विकास अधिकारी / समाज विकास सहायक | १५ दिवस | प्रमुख, सामाजिक विकास कक्ष |
| १३. | ताबा पत्राच्या दिनांकापासून ते देखभाल निधीची गुंतवणूक झालेल्या दिनांकापर्यंत उपलब्ध व्याज वितरीत करणे | उप समाज विकास अधिकारी / समाज विकास सहायक | १५ दिवस | प्रमुख, सामाजिक विकास कक्ष |

| अनु. क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचा हुद्दा | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या अधिकाऱ्याचे पदनाम |
|---|---|---|---|---|
| १४. | पुनर्वसनोत्तर प्रकल्पग्रस्तांच्या तक्रारीची पूर्तता<br>अ) या कक्षाकडे उपलब्ध असलेल्या माहितीची विचारणा करण्यात आलेल्या पत्राला उत्तर देणे<br>ब) घुसखोरीबाबतच्या तक्रारी | उप समाज विकास अधिकारी<br>तहसिलदार | १५ दिवस<br>९०दिवस | प्रमुख, सामाजिक विकास कक्ष<br>प्रमुख, सामाजिक विकास कक्ष |
| १५. | महात्मा गांधी पथक्रांती योजना व पालिकेस उपलब्ध करुन दिलेल्या सदनिकांबाबतच्या तक्रारी संदर्भात उपलब्ध माहिती देणे | विशेष भूसंपादन अधिकारी / समाज विकास सहायक | १५ दिवस | प्रमुख, सामाजिक विकास कक्ष |
| १६. | मिठी नदी पुनर्वसन प्रकल्पांतर्गत येणारी कामे – पात्र प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करणे | नायब तहसिलदार / समाज विकास सहायक / आरेखक | निवासी ३० दिवसांपर्यंत अनिवासी ४५ दिवसांपर्यंत | उप जिल्हाधिकारी |

## दक्षता विभाग

| अनु. क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचा हुद्दा | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या अधिकाऱ्याचे पदनाम |
|---|---|---|---|---|
| १ | कामांची तपासणी करुन अहवाल निर्गमित करणे | अधिक्षक अभियंता कार्यकारी अभियंता | तपासणी दिनांकापासून ३० दिवस | संचालक (दक्षता) |
| २ | प्राधिकरणाच्या विभागातून प्राप्त अंदाजपत्रकाची तपासणी करणे | | आवश्यक त्रुटीची पूर्तता झाल्यानंतर १५ दिवस | |
| ३ | प्राधिकरणास प्राप्त तांत्रिक तक्रारीबाबत चौकशी करुन अहवाल सादर करणे. | | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर ४५ दिवस | |

# भूमि व मिळकत शाखा

| अनु. क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचा हुद्दा | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या अधिकाऱ्याचे पदनाम |
|---|---|---|---|---|
| १. | वांद्रे-कुर्ला संकुलामधील प्राधिकरणाच्या मालकीच्या जमिनीविषयी माहिती देणे | भूमि व मिळकत व्यवस्थापक | ७ दिवस | उप महानगर आयुक्त (भूमि व मिळकत) |
| २. | प्राधिकरणाच्या वांद्रे-कुर्ला संकुलामधील मोकळी जागा (ग्राऊंड) सामाजिक / मनोरंजन / धार्मिक या कार्यासाठी भाडे तत्वावर देणे | भूमि व मिळकत व्यवस्थापक | ७ दिवस | उप महानगर आयुक्त (भूमि व मिळकत) |
| ३. | प्राधिकरणाच्या ओशिवरा जिल्हा केंद्रांतर्गत जमीन मालकांनी विनंती केल्यानुसार जमीन संपादन करणे | विशेष कार्य अधिकारी | ६ दिवस | उप महानगर आयुक्त (भूमि व मिळकत) |
| ४. | पवई एरिया डेव्हलपमेंट स्कीम प्रकरणाच्या जमिनीबाबत माहिती देणे, तसेच आलेल्या अर्जासंबंधी माहिती देणे / जनतेकडून आलेल्या अर्जाला / पत्राला उत्तरे देणे, माहिती पुरविणे. | भूमि व मिळकत व्यवस्थापक | ३० दिवस | उप महानगर आयुक्त (भूमि व मिळकत) |
| ५. | प्राधिकरणाच्या जमिनीवरील भाडेपट्टा करारावरील भाडे रक्कम वसूल करणे | भूमि व मिळकत व्यवस्थापक | १ दिवस | उप महानगर आयुक्त (भूमि व मिळकत) |
| ६. | प्राधिकरण राबवित असलेल्या प्रकल्पांतर्गत वितरीत केलेल्या जमिनीवर अतिक्रमण करणाऱ्या अतिक्रमण धारकावर कार्यवाही करणे | प्रमुख भूमापक / सहा.भूमि व मिळकत व्यवस्थापक / सहा. निष्कासन अधिकारी | ५ दिवस | उप महानगर आयुक्त (भूमि व मिळकत) |
| ७. | प्राधिकरणाच्या पुनर्वसन वसाहतीमध्ये अनधिकृतपणे वास्तव्यास असणाऱ्यांवर निष्कासनाची कार्यवाही करणे आणि प्रकल्पांतर्गत बाधित बांधकामाचे निष्कासन करणे | सल्लागार, निष्कासन अधिकारी / सहा. निष्कासन अधिकारी | ७ दिवस | उप महानगर आयुक्त (भूमि व मिळकत) |

## भूमि शाखा / पणन शाखा (वडाळा भारवाहक तळ)

| अनु. क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचा हुद्दा | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या अधिकाऱ्याचे पदनाम |
|---|---|---|---|---|
| १. | अ) वडाळा भारवाहक तळ येथील प्राधिकरणाच्या मालकीच्या इमारतीमधील (ए-१, बी-१, बी-२, डी-२ व सुविधा इमारत) गाळे वाटपाचे भाडे, मालमत्ता कर / देखभाल कर, दंडनीय व्याज रक्कम वसूल करणे.<br>ब) वांद्रे-कुर्ला संकुल / वडाळा भारवाहक तळ येथील स्टॉलचे अनुज्ञाप्ती (Leave Licence) करारावर वाटप करणे, स्टॉल वाटपाचे भाडे वसूल करणे | भूमि व्यवस्थापक | ३० दिवस | उप महानगर आयुक्त (भूमि व मिळकत) |

## एस.आर.ए. शाखा

| अनु. क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचा हुद्दा | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या अधिकाऱ्याचे पदनाम |
|---|---|---|---|---|
| १. | एस.आर.ए. सेल विभागात प्राप्त झालेले प्रस्ताव विकास नियंत्रण नियमावली ३३ (१०) मधील तरतुदीनुसार तपासणे व इरादापत्र (Letter of Indent) निर्गमित करणे | विशेष कार्य अधिकारी एस.आर.ए.सेल | ३० दिवस | उप महानगर आयुक्त (भूमि / मिळकत / एस.आर.ए.सेल) |
| २. | आराखडा (Layout) मंजूर करणे | विशेष कार्य अधिकारी | ८ दिवस | उप महानगर आयुक्त (भूमि/मिळकत/ एस.आर.ए.सेल) |
| ३. | (Intimation of Approval) (आय.ओ.ए.) निर्गमित करणे | विशेष कार्य अधिकारी | ८ दिवस | उप महानगर आयुक्त (भूमि / मिळकत / एस.आर.ए.सेल) |
| ४. | बांधकाम प्रमाणपत्र (Commencement Certificate) निर्गमित करणे | विशेष कार्य अधिकारी | ८ दिवस | उप महानगर आयुक्त (भूमि / मिळकत / एस.आर.ए.सेल) |
| ५. | भोगवटा प्रमाणपत्र (Occupation Certificate) निर्गमित करणे | विशेष कार्य अधिकारी | ८ दिवस | उप महानगर आयुक्त (भूमि / मिळकत / एस.आर.ए.सेल) |
| ६. | बांधकाम व जमिन यांचा विकास हस्तांतरण हक्क (TDR) देण्याबाबत मुंबई महानगरपालिकेस शिफारस पत्र निर्गमित करणे | विशेष कार्य अधिकारी | १० दिवस | उप महानगर आयुक्त (भूमि / मिळकत / एस.आर.ए.सेल) |

## वित्त व लेखा विभाग

| अनु. क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचा हुद्दा | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या अधिकाऱ्याचे पदनाम |
|---|---|---|---|---|
| १. | अदायगी आणि जमा रकमा | सहायक मुख्य लेखा अधिकारी (रोख) | सकाळी ११ ते १ दुपारी २ ते ४ वाजता (सोम. ते शुक्र.) | उप मुख्य लेखा अधिकारी |

## भाडे तत्वावरील घरे कक्ष

| अनु. क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचा हुद्दा | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या अधिकाऱ्याचे पदनाम |
|---|---|---|---|---|
| १. | स्थळदर्शक मंजूरी (लोकेशन क्लिअरन्स) | नियोजक उप नियोजक | ६० दिवस (दि.३०.११.२०१३ रोजीच्या शासकीय सुचनेनुसार बंद) | प्रमुख, भाडे तत्वावरील घरे विभाग |
| २. | रेखांकन मंजुरी | नियोजक उप नियोजक | ३० दिवस | प्रमुख, भाडे तत्वावरील घरे विभाग |
| ३. | बांधकाम परवान्यासाठी / भोगवटा प्रमाणपत्रासाठी ना हरकत दाखला | नियोजक उप नियोजक | ३० दिवस | प्रमुख, भाडे तत्वावरील घरे विभाग |
| ४. | विक्रियोग्य घटक तारण ठेवण्यासाठी ना हरकत दाखला | नियोजक उप नियोजक | १० दिवस | प्रमुख, भाडे तत्वावरील घरे विभाग |

## विधी शाखा

| अनु. क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचा हुद्दा | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या अधिकाऱ्याचे पदनाम |
|---|---|---|---|---|
| १. | माहितीचा अधिकार – २००५ अधिनियमांतर्गत प्राप्त झालेल्या अर्ज व अपील अर्जांना माहिती देणे | सहायक विधी अधिकारी तथा जनमाहिती अधिकारी | माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार आवश्यक कार्यवाही करण्यासाठी निर्धारीत केलेला कालावधी | सह प्रकल्प संचालक (विधी) तथा अपिलीय अधिकारी |

## प्रशासन विभाग १, २, ३ आणि ४

| अनु. क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचा हुद्दा | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या अधिकाऱ्याचे पदनाम |
|---|---|---|---|---|
| १. | प्राधिकरणांतर्गत अधिकारी / कर्मचारी यांची नियुक्ती / पदोन्नतीसंदर्भातील निवेदने / प्रकरणे | आस्थापना अधिकारी (१) | ९० दिवस | प्रशासकीय अधिकारी |
| २. | नोकरी मिळणेकरीता प्राप्त होणारे अर्ज / तक्रार अर्ज इतर अर्ज इ. | आस्थापना अधिकारी (१) | ३० दिवस | प्रशासकीय अधिकारी |
| ३. | माहिती अधिकारांतर्गत माहितीकरीता प्राप्त होणारे अर्ज / अपिल इ. | जन माहिती अधिकारी / आस्थापना अधिकारी (१) | ३० दिवस ते ४५ दिवस | अपिलीय अधिकारी / प्रशासकीय अधिकारी |
| ४. | शासकीय, निमशासकीय व सामान्य जनता तसेच टपाल खाते यांच्याकडून आलेल्या आवक टपालाची नोंद घेवून विषयानुरुप सर्व टपाल प्राधिकरणातील संबधीत विभागांकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित करणे | कक्ष अधिकारी, प्रशासन विभाग, पथक (३) | १ दिवस (तात्काळ) | सचिव, कार्यकारी समिती, प्रशासन विभाग |

## अभियांत्रिकी विभाग

| अनु. क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचा हुद्दा | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या अधिकाऱ्याचे पदनाम |
|---|---|---|---|---|
| १. | किरकोळ दुरूस्ती | संबंधीत कार्यकारी अभियंता | १० दिवसांच्या आत | अधिक्षक अभियंता |
| २. | मोठी दुरुस्ती | संबंधीत कार्यकारी अभियंता | १ महिन्याच्या आत | अधिक्षक अभियंता |
| ३. | विशेष दुरूस्ती | संबंधीत कार्यकारी अभियंता | नियोजित वेळेप्रमाणे ३ महिना | अधिक्षक अभियंता |

## माहिती व तंत्रज्ञान कक्ष

| अनु. क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचा हुद्दा | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या अधिकाऱ्याचे पदनाम |
|---|---|---|---|---|
| १. | मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाच्या अधिकारी व कर्मचारी वर्गाला (आय.टी.) माहिती व तंत्रज्ञान संबंधीत अखंड सेवा पुरविणे याबाबतची माहिती | उप अभियंता (१) माहिती व तंत्रज्ञान कक्ष | १५ दिवस | सह प्रकल्प संचालक (न.नि) |

## पाणी पुरवठा स्त्रोत व्यवस्थापन कक्ष

| अनु. क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचा हुद्दा | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या अधिकाऱ्याचे पदनाम |
|---|---|---|---|---|
| १. | मुंबई महानगर क्षेत्रासाठी ४०३ द.ल. लीटर प्रतिदिन सुर्या नळपाणी पुरवठा योजनेसंबंधीत माहिती | प्रमुख, सल्लागार, पा.पु.स्त्रो.व्य.कक्ष | १५ दिवस | सह प्रकल्प संचालक (न.नि) |

## <u>घनकचरा व्यवस्थापन कक्ष</u>

| अनु. क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचा हुद्दा | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या अधिकाऱ्याचे पदनाम |
|---|---|---|---|---|
| १. | मुंबई महानगर क्षेत्राच्या पूर्व उप प्रदेशातील स्थानिक स्वराज्य संस्थासाठी तळोजा येथे प्रादेशिक एकात्मिक नागरी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प राबविण्याच्या कार्यवाही संबंधीत माहिती | प्रमुख, सल्लागार, घ.क.व्य.कक्ष | १५ दिवस | सह प्रकल्प संचालक (न.नि) |
| २. | मुंबई महानगर क्षेत्रात ई-कचरा व विल्हेवाट सुविधा विकसित करण्याची कार्यवाही संबंधीत माहिती | प्रमुख, सल्लागार, घ.क.व्य.कक्ष | १५ दिवस | सह प्रकल्प संचालक (न.नि) |

## मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरण

| अनु. क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचा हुद्दा | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या अधिकाऱ्याचे पदनाम |
|---|---|---|---|---|
| १. | मिठी नदी विकास कामे संबंधी मुंबई महानगरपालिका, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA), CWPRS, IIT, NEERI, UDD, इत्यादी संस्थांसोबत समन्वय साधणे | नियोजक (अति.कार्यभार) / उप नियोजक | ३० दिवस | सह प्रकल्प संचालक (न.नि) व सदस्य सचिव व प्रकल्प संचालक, मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरण |

## मरीन ड्राईव्ह कामे, स्ट्रीट फर्निचर, बस आश्रयस्थाने

| अनु. क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचा हुद्दा | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या अधिकाऱ्याचे पदनाम |
|---|---|---|---|---|
| १. | **अ) मरीन ड्राईव्ह कामे –** मरीन ड्राईव्ह पुर्ननुतनीकरण टप्पा-२ संबंधीत माहिती<br>**ब) स्ट्रीट फर्निचर –**<br>**क) बस आश्रयस्थाने – MUTP**<br>उभारणी व व्यवस्थापन व तक्रार निवारणा संबंधीत माहिती | उप नियोजक | ३० दिवस | सह प्रकल्प संचालक (न.नि) |

## जलविज्ञान कक्ष

| अनु. क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचा हुद्दा | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या अधिकाऱ्याचे पदनाम |
|---|---|---|---|---|
| १. | मुंबई महानगर प्रदेशातील प्रमुख नद्यांचे पूर आलेखन नकाशे तयार करणे बाबतची माहिती | कार्यकारी अभियंता | ३० दिवस | सह प्रकल्प संचालक (न.नि) |

**खार जमिन (सॉल्ट पॅन लॅन्ड), लॅन्डस्केपिंग आणि ब्युटिफिकेशन, ई-बसेस, हॉटेल ना-हरकत प्रमाणपत्र**

| अनु. क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचा हुद्दा | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या अधिकाऱ्याचे पदनाम |
|---|---|---|---|---|
| १. | **अ) खार जमिन (सॉल्ट पॅन लॅन्ड) –** मुंबईतील खार जमिनींचे व्यवस्थापन व विकास करणे बाबतची माहिती **ब) लॅन्डस्केपिंग आणि ब्युटिफिकेशन –** रस्ते दुभाजक, वाहतूक बेटे, उद्याने, इत्यादींचे लॅन्डस्केपिंग, ब्युटिफिकेशन व देखभाल करणे बाबतची माहिती **क) ई-बसेस –** वांद्रे-कुर्ला संकुलात ई-बसेस सेवा पुरविणे बाबतची माहिती **ड) हॉटेल ना-हरकत प्रमाणपत्र –** तारांकीत हॉटेल्सच्या बांधकामासाठी ना-हरकत प्रमाणपत्र देणेबाबतची माहिती | उप नियोजक | ३० दिवस | सह प्रकल्प संचालक (न.नि) |

## विमानपत्तन प्राधिकरण

| अनु. क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचा हुद्दा | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या अधिकाऱ्याचे पदनाम |
|---|---|---|---|---|
| १. | अपर जिल्हाधिकारी (अतिक्रमण / निष्कासन) यांच्यामार्फत प्रकल्पग्रस्तांचे सर्वेक्षण करणे व पात्रता निश्चित करणे व त्या आधारे यादी तयार करणे | उप जिल्हाधिकारी अतिक्रमण / निष्कासन वांद्रे, अंधेरी, बोरीवली, कुर्ला, भांडूप, मुलूंड कार्यालय | १५ दिवस | प्रमुख, विमान पत्तन झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प |

# उप निबंधक सहकारी संस्था

| अनु. क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचा हुद्दा | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या अधिकाऱ्याचे पदनाम |
|---|---|---|---|---|
| १. | जनतेकडून आलेल्या तक्रारींना अंतिम उत्तर देणे | सहकारी अधिकारी (श्रेणी- १) | ३० दिवस | उप निबंधक, सहकारी संस्था |
| २. | उप निबंधक सहकारी संस्था, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण मुंबई सहकारी संस्थांची नोंदणी | सहकारी अधिकारी (श्रेणी- १) | ६० दिवस | उप निबंधक, सहकारी संस्था |
| ३. | सहकारी संस्थाची पोटनियम दुरुस्ती | सहायक सहकारी अधिकारी | ६० दिवस | उप निबंधक, सहकारी संस्था |
| ४. | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५१ अनुसार नामनिर्देशन पत्रावर दाखल झालेल्या अर्जावरील अपिलाचा निर्णय | सहकारी अधिकारी (श्रेणी- १) | १० दिवस | उप निबंधक, सहकारी संस्था |
| ५. | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६१ चे नियम क्र.३० अन्वये निबंधक कार्यालयातील कागदपत्रांची पाहणी करणे | मुख्य लिपिक | १ दिवस | उप निबंधक, सहकारी संस्था |